सकाळ



CITY - NEWS

सोमवार १६ जानेवारी २०१७/२

# मुंबईत मॅरेथॉनचे रंग

**बॉलीवूड सेलिब्रिटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील व्हीआयपी मुंबई मॅरेथॉनचा अविभाज्य घटक झाल्याचे यंदाही दिसून आले.**



मुंबई मॅरेथॉनला 'फ्लॅग ऑफ' करण्यासाठी आलेले मान्यवर. डावीकडून शायना एन. सी., महादेव जानकर, राज पुरोहित, जयकुमार रावत, विनोद तावडे, केंद्रीय क्रीडामंत्री विजय गोयलसोबत अमृता फडणवीस, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आशीष शेलार.

कोळी परंपरा सादर करत तिरंगा फडकवताना नागरिक.



## ११ धावपटू रुग्णालयात

न थांबता धावण्याचा प्रयत्न व वाढते तापमान यामुळे अनेक स्पर्धकांना अशक्तपणा जाणवला. उलट्या, मळमळ, डिहायड्रेशन, पायात गोळे येणे आदीसारखा त्रास त्यांना जाणवू लागला. सहभागी स्पर्धकांपैकी ११ धावपटूंना अत्यवस्थ वाटल्याने त्यांना जसलोक, हिंदुजा, लीलावती व बॉम्बे या रुग्णालयांत दाखल करण्यात आले. त्यांच्याजवळच्या नातेवाइकांना याबाबत माहिती देण्यात आली आहे, असे डॉ. विजय डिसिल्वा यांनी

## कडेकोट पोलिस बंदोबस्त

बंदोबस्तासाठी मुंबईचे पोलिस आयुक्त दत्ता पडसलगीकर, सहआयुक्त देवेन भारती, अतिरिक्त आयुक्त प्रताप दिघावकर, उपायुक्त डॉ. मनोजकुमार शर्मा आदी अधिकारी मॅरेथॉनवर जातीने लक्ष ठेवून होते. मॅरेथॉनसाठी मुंबई पोलिसांसह आझाद मैदान वाहतूक पोलिस शाखेने १२५ अंमलदार व २० अधिकाऱ्यांसह चोख बंदोबस्त ठेवला होता. एम. आर. आंबेडकर मार्ग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुखलाल वर्पे, निरीक्षक जी. एल. मोरे यांच्यासह ३५ अधिकारी व २०० पोलिस तैनात होते. ११ कार्डियाक रुग्णवाहिका, सात बायकर्स डॉक्टर टीम, ११ मेडिकल सेंटर, ४२ बेड, ५०० कर्मचारी

